# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक

# अंतःशुद्धीचे सोपान

## *उद्धरण ९*

लोक बाबांना विचारीत असत, “बाबा, कित्येक लोक, कित्येक वर्षांपासून तुमच्याजवळ आहेत. पण असे का बरे वाटते, की त्यांपैकी काही जणांनी थोडीदेखील प्रगती केलेली नाही?”

बाबा म्हणत, “याबद्दल मी काही करू शकत नाही. सारे काही त्यांच्यावर अवलंबून आहे. ज्या कोणाला प्रगती करायची असेल, तो करू शकतो. त्याने माझ्याजवळ असण्याची आवश्यकता नाही. त्याने केवळ शिकवणींचे पालन करायचे असते, अभ्यास करायचे असतात आणि गुरूंचे स्मरण करायचे असते. अत्यल्प काळातच तो खूप प्रगती करतो.”

तुम्ही तुमच्या मनात जे काही धारण करता, तेच आध्यात्मिक मार्गावर प्रगतीचा प्रेरणास्रोत बनते. सत्त्व-संशुद्धी, बोधाचा एक स्तर आहे. तिला प्राप्त करणे यावर अवलंबून असते, की तुम्ही काय विचार करीत आहात, तुम्हाला काय जाणवते आहे आणि विशेषतः, हे तुमच्या कर्मांवर अवलंबून आहे.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय २ ‘अस्तित्वाची शुद्धी,’ यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. ३२.